महाराष्ट्र शासनाचे चार, नऊ व पंधरा वर्षे मुदतीचे १००० कोटी रुपयांचे रोखे विक्रीस >> पान 2

शशिकांत शिंदे यांच्या वक्तव्याने राज्यात मोठ्या भूकंपाचे संकेत >> पान 3

प्रचारात शिंदे शिवसेनेला मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद >> पान 4

दैनिक

# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 112 ■ शुक्रवार, दि. 28 नोव्हेंबर 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

**सुविचार**

जगाचा कधी काळी उद्धार झाला
तर तो शिक्षकांकडून होईल.- वि.स. खांडेकर



आमिर खानला उत्कृष्ट काम गिरीसाठी मिळाला आरके लक्ष्मण पुरस्कार...

आतील पान

# कर्जदारांसाठी गुड न्यूज, आता दर आठवड्याला क्रेडिट स्कोअर अपडेट होणार

**नवी दिल्ली : जर तुम्ही क्रेडिट कार्डस्चा वापर करत असाल किंवा कर्जाचे ईएमआय भरत असाल तर तुमच्यासाठी दिलासा देणारी अपडेट आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया लवकरच एक नियम लागू करणार आहे. त्यानुसार एप्रिल २०२६ पासून लोकांना क्रेडिट स्कोअरसाठी फार वाट पाहावी लागणार नाही. तुमचा क्रेडिट स्कोअर दर सात दिवसांनी अपडेट केला जाणार आहे.**


## आरबीआयच्या नव्या नियमामुळे फायदा होणार

नव्या नियमानुसार आता क्रेडिट स्कोअर एका महिन्यात दोन वेळा अपडेट करण्याऐवजी दर सात दिवसानंतर अपडेट केला जाणार आहे. हा बदल आरबीआयच्या ड्राफ्ट क्रेडिट इन्फॉर्मेशन रिपोर्टिंग (प्रथम दुरुस्ती) निर्देश २०२५ नुसार लागू केला जाणार आहे. या प्रस्तावानुसार सर्व क्रेडिट इन्फॉर्मेशन कंपन्यांना एका महिन्यात पाचवेळा कर्जदाराची माहिती अपडेट करावी लागेल. यासाठीच्या तारखा दर महिन्याच्या ७, १४, २१, २८ आणि महिन्याचा शेवटचा दिवस अशा असतील.

आरबीआयच्या या पावलाचा उद्देश क्रेडिट डेटा रिपोर्टिंग आणि अपडेट करण्याच्या पद्धतीमध्ये मोठा बदल करणं आहे. यामुळं ज्या लोकांचं कर्ज लेटेस्ट क्रेडिट स्कोअरमुळं प्रलंबित आहे त्यांना फायदा होणार आहे.

**काय बदल होणार?**

बँक किंवा वित्तीय संस्थांना महिन्यात एकदा किंवा दोनवेळा सिबिल, इक्विफॅक्स, एक्सपीरियन किंवा क्रिफ हाई मार्क या सारख्या क्रेडिट ब्यूरोला डेटा पाठवायला लागत असे. आता बँक किंवा एनबीएफसी महिन्यात एकदा क्रेडिट रेकॉर्डची माहिती पाठवतील. मात्र, त्यांना दरम्यानच्या बदलांची माहिती द्यावी लागेल. ज्यामध्ये नव्यानं कर्ज दिलं गेलं असेल, बंद केलेली खाती, कर्ज परतफेड, कर्जदाराची माहिती यातील काही बदल, कर्जाचं वर्गीकरण यातील बदल याची माहिती, म्हणजेच एखाद्यानं क्रेडिट कार्ड बंद केलं, कर्जाची पूर्ण परतफेड केली किंवा रिपेमेंट ट्रॅक रेकॉर्डमध्ये सुधारणा केली तर हे बदल काही दिवसात त्याच्या क्रेडिट रिपोर्टमध्ये दिसतील.




**कर्जदारांना काय फायदा होणार?**

ईएमआय किंवा कर्ज परतफेडीनंतर क्रेडिट स्कोअरमध्ये सुधारणांसाठी दीर्घकाळ वाट पाहावी लागणार नाही. क्रेडिट स्कोअरमध्ये ज्या वेगानं सुधारणा होईल त्याच वेगानं कर्ज मंजूर होईल. वेळोवेळी डेटा अपडेट झाल्याचा फायदा क्रेडिट हेल्थवर दिसून येईल. त्यामुळं चांगल्या व्याज दरावर कर्ज मिळण्यास मदत होईल. बँकेजवळ तुमचा लेटेस्ट अपडेटेड डेटा असल्यास नवं कार्ड आणि कर्जासाठी अर्ज करता त्यावेळी कोणतीही अडचण येणार नाही.

# पुढील दोन-तीन दिवसांत काय होईल सांगता येत नाही

## सुप्रीम कोर्टातील आरक्षणाच्या सुनावणीबाबत शरद पवारांचं महत्त्वाचं वक्तव्य

**पुणे/प्रतिनिधी : राज्याची तिजोरी कोणाच्या हातात आहे, यावरुन सध्या सत्ताधारी महायुतीमधील तिन्ही पक्षांमध्ये चढाओढ सुरु आहे. यावरुन तिन्ही पक्षांचे नेते राज्याच्या तिजोरीवर आमचेच वर्चस्व कसे, याबाबत सातत्याने वारंवार दावे करताना दिसत आहेत. या सगळ्यावर राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक शरद पवार यांनी भाष्य केले आहे. महायुतीमधील तीन पक्षांमध्ये निधी देण्यावरुन जी काही चढाओढ लागली आहे. हल्ली कामावर मतं मागितली जात नाहीत. मी पैसे देईन, निधी देईन, असे सांगितले जाते. ही काही चांगली गोष्ट नाही. अर्थकारण आणून निवडणुका जिंकायच्या हाच दृष्टीकोन असेल तर त्यावर भाष्य न केलेलं बरं, असे शरद पवार यांनी म्हटले. ते गुरुवारी बारामतीमध्ये प्रसारमाध्यमांशी बोलत होते.**



या निवडणुकीत फारसं राजकारण आणू नये, असे एक भूमिका घेतली होती. त्यामुळे या निवडणुकीत मला पहिल्यांदाच असं दिसतंय की ठिकठिकाणी गट झाले आहेत. एक पक्ष दुसऱ्या पक्षाबरोबर जात आहे. याचा अर्थ स्पष्ट आहे इथे एकवाक्यता नाही. पण ठीक आहे लोकांना हवं तो योग्य निकाल मतदानात देतील. त्यामध्ये अधिक लक्ष द्यायचं कारण नाही. माझ्यासारखे जे लोक आहेत याच्या आधीही कधी आणि आताही यात पडले नाहीत. आता दोन-चार दिवस राहिले आहेत, काय होतंय बघूया, असे शरद पवार यांनी म्हटले. यावेळी शरद पवार यांनी सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या आरक्षण मर्यादेच्या खटल्याबाबत महत्त्वपूर्ण टिप्पणी केली. सर्वोच्च न्यायालय काय निकाल देईल सांगता येत नाही. कारण यावेळी ५० टक्के आरक्षणाच्या मर्यादेचे पालन करण्याबाबत सर्वोच्च न्यायालयाची भूमिका आग्रही दिसत आहे. त्याचा अंतिम निर्णय दोन-तीन दिवसांत होईल, त्याबाबत आताच काही सांगता येत नाही, असे शरद पवार यांनी म्हटले. >> पान २

## अंबरनाथमध्ये शिंदे गट-भाजपमध्ये तुफान राडा, धमकीनंतर भाजप कार्यकर्त्यावर कोयत्याने हल्ला

अंबरनाथ : अंबरनाथमध्ये प्रचाराच्या कारणावरुन भाजप कार्यकर्ते सत्यम तेलंगे याच्यावर कोयत्याने हल्ला केल्याची घटना अंबरनाथच्या सर्वोदय नगर परिसरात घडली आहे. भाजप उमेदवाराचा प्रचार करू नको असे सांगत शिवेसना शिंदे गटाचा कार्यकर्ता साहिल वडनेरे याने हा हल्ला केल्याचा आरोप सत्यम तेलंगे याने केला आहे, या हल्ल्यात भाजप कार्यकर्ता सत्यम तेलंगे यांच्या हाताला गंभीर दुखापत झाली आहे तर अंबरनाथ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे, मात्र साहिल हा शिंदे शिवसेनेचा कार्यकर्ता नसल्याचा आरोप शैलेश भोईर यांनी स्पष्ट केलं असून पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

अंबरनाथमध्ये बुवापाडा सर्वोदय नगर पॅनल क्रमांक पाचमध्ये प्रचार करण्यावरून झालेल्या वादात भाजपा कार्यकर्ता सत्यम तेलंगे यांचावर कोयत्याने हल्ला करण्यात आला, हल्ला करणारा शिवसेना शिंदे गटाच्या कार्यकर्ता असल्याची माहिती आहे या प्रकरणात सत्यम तेलंगे यांनी प्रतिक्रिया दिली आहे, तर ज्या शिवसेना उमेदवाराच्या कार्यकर्त्यांनी सत्यम तेलंगे वर हल्ला केला आहे.

शरद पवार गटाचे नेते राम खाडे यांच्यावर बुधवारी रात्री जीवघेणा हल्ला झाल्याची खळबळजनक घटना समोर आली आहे. दहा ते पंधरा जणांच्या टोळक्याने त्यांच्यावर धारदार शस्त्रांनी हल्ला केला. प्राथमिक माहितीनुसार, अहिल्यानगर- बीड जिल्ह्याच्या सीमेलगत मांदगाव जवळ रस्त्यावर हा हल्ला झाल्याची माहिती आहे. राम खाडे हे सामाजिक कार्यकर्ते आणि शरद पवार गटाचे पदाधिकारी आहेत. ते मांदळी गावातून बीड जिल्ह्यात येत होते. राम खाडे गाडीतून जात असताना दहा ते पंधरा जणांच्या टोळक्याने त्यांची गाडी थांबवून थेट हल्ला चढवला. सुरुवातीला या हल्लेखोरांनी गाडीची नासधूस केली. हल्लेखोरांनी राम खाडे यांच्या गाडीवर जोरदार दगडफेक केली.

## पाच वर्ष उलटले तरी किती वेळ चौकशी करणार? हायकोर्टाने पोलिसांना फटकारले



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : मुंबई उच्च न्यायालयाने गुरुवारी (दि. २७) दिशा सालियन मृत्यू प्रकरणातील चौकशीबाबत गंभीर प्रश्न उपस्थित करत पोलिसांना फटकारले. दिशा सालियन हिचा ८ जून २०२० रोजी मालाड येथील इमारतीच्या १४व्या मजल्यावरून पडून मृत्यू झाला होता. तिच्यावर सामूहिक बलात्कार करून निर्घृण हत्या केल्याचा आरोप तिच्या कुटुंबीयांनी केला आहे. मृत्यूनंतर पोलिसांनी अपघाती मृत्यू म्हणून गुन्हा नोंदवला. मात्र, पाच वर्षे उलटूनही चौकशी प्रलंबित असल्याने न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त केली.

अजूनही चौकशी का?

न्यायमूर्ती ए.एस. गडकरी आणि आर. आर. भोसले यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. न्यायालयाने विचारले की, एवढ्या काळानंतरही चौकशी प्रलंबित कशी? कोणीतरी मरण पावले आहे. तुमचे काम इतकेच आहे, की ती आत्महत्या होती की सदोष मनुष्यवध. मग अजूनही चौकशी कशासाठी चालू आहे?

यावर सरकारी वकील एम. देशमुख यांनी सांगितले, की सर्व शक्यता तपासून पाहण्यासाठी चौकशी सखोल पद्धतीने केली जात आहे.

सालियन कुटुंबाचा आरोप

दिशा सालियनचे वडील सतीश सालियन यांनी मार्च २०२५ मध्ये उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. त्यामध्ये त्यांनी दावा केला की दिशावर सामूहिक बलात्कार >> पान २

## देवेंद्र फडणवीस गृहमंत्री आहेत, जास्त कराल तर कापून काढू

### आमदार आशिष देशमुखांची विरोधकांना धमकी



**नागपूर /प्रतिनिधी** : स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची रणधुमाळी सध्या सुरु आहे. या काळात सर्वच राजकीय नेते ऐकमेकांवर आरोप प्रत्यारोप करत आहेत. तसेच काही नेते वादग्रस्त वक्तव्य करताना दिसत आहेत. अशातच भाजप आमदार आशिष देशमुख यांनी देखील वादग्रस्त वक्तव्य केलं आहे. नागपूर जिल्ह्यातील कळमेश्वर नगरपरिषद निवडणुकीच्या प्रचारात बोलताना आमदार आशिष देशमुख यांनी विरोधकांना उघड धमकी दिली आहे. हे देवेंद्र फडणवीसांचे सरकार आहे. ते गृहमंत्री आहेत. ते नागपूरचे आहेत. त्यामुळं जास्त कराल तर कापून काढू अशी धमकी आशिष देशमुख यांनी दिली आहे. >> पान २




# राज्यातील या तीन प्रभागामधील निवडणूक थांबवा, निवडणूक आयोगाचा आदेश

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : राज्यात सध्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची रणधुमाळी सुरू आहे. सर्वच पक्षांनी कंबर कसली आहे.

दरम्यान निवडणूक आयोगाने एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. येत्या २ डिसेंबर रोजी होणाऱ्या नगर परिषद आणि नगर पंचायत निवडणुकीच्या पार्श्वभूमीवरराज्यातील तीन प्रभागामधील निवडणूक थांबवण्याचे आदेश देण्यात आले आहे. उमेदवारांचे आकस्मिक निधन झाल्यामुळे आयोगाला हा निर्णय घ्यावा लागला आहे.

राज्यातील २४६ नगरपालिका आणि ४६ नगरपंचायतींच्या निवडणुकांसाठी प्रचाराचा धुरळा आता अंतिम टप्प्यात पोहोचला आहे. मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्र्यांसह सर्वच बड्या पक्षांचे स्टार प्रचारक मैदानात उतरल्याने राजकीय वातावरण तापले आहे. मात्र, या उत्साहाच्या वातावरणात काही ठिकाणी उमेदवारांच्या मृत्यूमुळे शोककळा पसरली असून, निवडणूक आयोगाने संबंधित प्रभागांतील निवडणुका स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे.

**काय आहे निवडणूक आयोगाचा आदेश?**

राज्यातील तीन प्रभागामधील निवडणूक थांबवण्याचे आदेश निवडणूक आयोगाने दिले आहेत. नगरसेवक पदासाठी अर्ज भरलेल्या उमदवारांचे आकस्मिक निधन झाल्यामुळे आयोगाने हा निर्णय घेतला आहे. पिंपळनेरमधील प्रभाग २, मनमाडमधील प्रभाग १० आणि गेवराई मधील प्रभाग ११ मधील निवडणुका स्थगित करण्याचे आदेश आयोगाने दिले आहे. मात्र अध्यक्ष पदाच्या निवडणुकीस मात्र कुठलीही स्थगिती नाही, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

**काय आहे शासन आदेश?**

निवडणुकांध्ये वैधरित्या निवडणूक कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या निवडणुकांमध्ये संदर्भाधीन कार्यक्रमान्वये खाली नमूद केल्यानुसार सदस्यपदाच्या उमेदवारांची यादी प्रसिद्ध झाल्यानंतर नामनिर्देशित निवडणूक लढवित असलेल्या उमदवारांचा मृत्यू झाला असल्याने त्या प्रभागामधील त्या एका यावी किंवा पुर्ण प्रभागासाठी निवडणूक प्रक्रिया निवडणूक प्रक्रिया थांबविण्यात जागेसाठी थांबविण्यात यावी याबाबत आयोगाचे आदेश होणेस विनंती केली आहे. निवडणूक नियम, १९६६ च्या नियम २३ अंतर्गत नमुद तरतुदी आणि महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, आणि औद्योगिक नगरी १९६५ च्या कलम १० (१) (२) नगरपंचायती महाराष्ट्र नगरपरिषदा, दोन्ही जागांकरता विभागणी दोन जागांमध्ये करण्यात येत असल्याने च्या तरतुदींनुसार प्रभागाची

प्रक्रिया निवडणूक निवडणूक प्रक्रिया थांबविणे क्रमप्राप्त आहे. परंतु अध्यक्ष पदाच्या या प्रभागातील निवडणूक प्रक्रिया थांबविण्यात येत नसून अध्यक्षपदाची या प्रभागातील निवडणूक प्रक्रिया नियोजीत कार्यक्रमानुसार सुरू होईल.

## कोणत्या परिषदेसाठी घेतला निर्णय?

धुळे, नाशिक, बीड जिल्ह्यातील नगपरिषदेसाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. पिंपळनेर, मनमाड आणि गेवराई नगरपंचायतीसाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. धुळ्याच्या पिंपळनेर नगरपंचायतीच्या प्रभाग क्रमांक २ मधील पाथरे कुसुमबाई खडू, नाशिकच्या मनमाज नगरपंचायतीच्या प्रभाग क्रमांक १० मधील नितीन अनिल वाघमारे, बीडच्या गेवराई नगरपंचायतीच्या प्रभाग क्रमांक ११ मधील दूरदानाबेगम सलीम फारूकी यांचे निधन झाल्याने निवडणुकांना स्थगिती देण्यात आली आहे.

## महात्मा जोतीराव फुले

भारताचे थोर सुपुत्र, विचारवंत, समाजसुधारक, लेखक महात्मा जोतीराव फुले यांचा आज स्मृतिदिन. महात्मा जोतीराव फुले यांचा जन्म ११ एप्रिल १८२७ रोजी झाला. जोतीरावांच्या वडिलांचे नाव गोविंदराव तर आईचे नाव चिमणाबाई असे होते. सातारा जिल्ह्यातील कटगुण हे त्यांचे मूळ गाव. त्यांचे आडनाव गोऱ्हे असे होते पण त्यांच्या वडिलांचा फुले विक्रीचा व्यवसाय होता त्यामुळे ते फुले म्हणूनच ते ओळखले जाऊ लागले पुढे फुले हेच आडनाव रूढ झाले. काही दिवसांनी कटगुणहुन त्यांचे कुटुंबीय पुरंदर तालुक्यातील खानवडी येथे आले. खानवडी येथे त्यांचे घर असून त्यांच्या नावे सात बाराचा उतारा देखील आहे. प्राथमिक शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांनी भाजी विक्रीचा व्यवसाय केला. जोतीराव फुले यांना लहानपणापासून शिक्षणाची आवड होती. १८४२ साली त्यांनी पुण्याच्या स्कॉटिश मिशन हायस्कूलमध्ये माध्यमिक शिक्षण घेण्यासाठी प्रवेश घेतला. अतिशय तल्लख बुद्धीच्या जोतिरावांनी पाच सहा वर्षातच तो अभ्यासक्रम पूर्ण केला. २३ सप्टेंबर १८७३ रोजी महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. तथाकथित सनातनी उच्चवर्णीय लोकांकडून सर्वसामान्य लोकांवर होणारा अन्याय अत्याचर दूर करणे तसेच गुलामगिरीतून शूद्रातिशूद्र समाजाची मुक्तता करणे व त्यांना त्यांच्या हक्काची जाणीव करुन देणे हे सत्यशोधक समाजाचे ध्येय होते. सर्वसाक्षी जगतप्ती। त्याला नकोच मध्यस्ती।। हे या समाजाचे घोषवाक्य होते. सत्यशोधक समाजाने गुलामगिरीविरुद्ध आवाज उठवला आणि समाज न्यायाची व सामाजिक पुनर्रचनेची मागणी केली. या समाजातर्फे पुरोहितांशीवाय लग्न लावण्यास सुरवात केली. मराठीत मंगलाष्टके रचली. समाजातील तळागाळातील लोकांपर्यंत शिक्षण पोहचवणे हे सत्यशोधक समाजाचे महत्वाचे ध्येय होते. महात्मा फुले यांनी एका कवितेत शिक्षणाचे महत्व पटवून देताना म्हटले आहे की विद्येविना मती गेली । मतिविना नीती गेली। नितीविना गती गेली । गतिविना वित्त गेले । वित्ताविना शूद्र खचले । इतके अनर्थ एका अविद्येने केले ।। एक महिला शिकली तर संपूर्ण कुटुंब शिकते. समाज शिक्षित करायचा असेल आणि बहुजन समाजात शिक्षण मुहूर्तमेढ रोवयची असेल तर महिलांना शिक्षित व्हायलाच हवे असे त्यांचे मत होणे म्हणूनच त्यांनी त्याची सुरवात स्वतःच्या घरापासून केली. जोतिरावांनी त्यांच्या पत्नी सावित्रीबाईंना शिक्षण देऊन शिक्षण कार्यास प्रवृत्त केले. महात्मा फुले यांनी १८४८ साली पुण्यातील भिडे वाड्यात मुलींची पहिली शाळा काढून तेथील शिक्षिकेची जबाबदारी सावित्रीबाईंवर सोपवली. पुढे सावित्रीबाई या शाळेच्या मुख्याध्यापिकापदी आरूढ झाल्या.शाळेच्या मुख्याध्यापकपदी आरूढ झालेली भारतातील पहिली महिला म्हणजे सावित्रीबाई फुले त्याचप्रमाणे मुलींसाठी पहिली शाळा काढणारे पहिले भारतीय म्हणजे महात्मा जोतीराव फुले. महात्मा जोतीराव फुलेंनी देशात मुलींच्या शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. आज सर्वच क्षेत्रात महिला आघाडीवर आहेत असे कोणतेच क्षेत्र नाही की ज्यात महिलांनी आपला झेंडा रोवला नाही. कला, क्रीडा, साहित्य, विज्ञान, तंत्रदान, शिक्षण, समाजकारण, राजकारण, अर्थकारण अशा सर्वच क्षेत्रात महिला आघाडीवर आहेत त्या केवळ आणि केवळ फुले दाम्पत्यांमुळे. महिलांसाठी फुले दाम्पत्यांनी जे कार्य केले ते ३३ कोटी देवांनीही केले नाही. महात्मा फुले यांनी पुण्यातील वेताळ पेठेत १८५२ साली अस्पृश्यांसाठी शाळा स्थापन केली. त्यांच्या या शैक्षणिक कार्याला सनातन्यांनी खूप वविरोध केला. मुलींनी शिक्षणासाठी घराबाहेर पडणे म्हणजे धर्म बुडणे अशी आरोळी ठोकत सनातनी लोकांनी महात्मा फुले यांच्या या महान कार्यास विरोध केला. त्यांना मारण्यासाठी मारेकरी पाठवले पण महात्मा फुले डगमगले नाहीत. ते आपल्या भूमिकेवर ठाम राहिले. महात्मा जोतीराव फुले यांना वाचनाची खूप आवड होती. विवीध महापुरुषांचे जीवनचरित्र वाचणे व त्यातून प्रेरणा घेणे हा त्यांचा आवडीचा छंद. छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र व थॉमस पेन या विचारवंतांच्या राईट ऑफ थॉट्स या ग्रंथाचा त्यांच्यावर खूप प्रभाव पडला. बहुजन समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा आणि दारिद्र्य पाहून ते खूप अस्वस्थ होत. जातपात, अस्पृश्य- स्पृश्य भेदभाव पाहून त्यांना खूप राग येत. समाजातील अज्ञान अंधश्रद्धा दूर करून समाजातील जातीभेद नष्ट करण्याचा त्यांनी निश्चय केला. कोणताही धर्म ईश्वराने निर्माण केलेला नाही आणि चातुर्वर्ण्य व जातीभेद ही निर्मिती मानवाचीच आहे असे त्यांचे रोखठोक मत होते. सर्व मानव एकच आहेत म्हणून सर्वांनी गुण्यागोविंदाने राहावे असे त्यांचे मत होते. त्यांनी लिहिलेल्या शेतकऱ्यांचा आसूड या पुस्तकातून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची विदारक दुर्दशा आणि दारिद्र्याची वास्तवता विशद केली आहे. या पुस्तकाद्वारे विशाल दृष्टिकोनाचे क्रांतिकारक म्हणून महात्मा फुलेंचे दर्शन होते. महात्मा फुले यांनी सार्वजनिक सत्यधर्म हा ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ सत्यशोधक समाजाचा प्रमाण ग्रंथ मानला जातो. तुकारामांच्या अभांगाचा त्यांना गाढा अभ्यास होता. अभंगाच्या धर्तीवर त्यांनी अनेक अखंड रचले. त्यांना सामाजिक विषमतेचे जागतिक भान होते म्हणूनच आपला गुलामगिरी हा ग्रंथ त्यांनी अमेरिकेतील कृष्णवर्णीयांना समर्पित केला. अस्पृश्यांची कैफियत हा त्यांचा अप्रकाशित ग्रंथ आहे. २८ नोव्हेंबर १८९० रोजी महात्मा फुले यांचे निधन झाले. आज त्यांच्या स्मृतिदिनी त्यांचे स्मरण करणे हे आपले कर्तव्यच आहे. महात्मा फुलेंना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

# महाराष्ट्र शासनाचे चार, नऊ व पंधरा वर्षे मुदतीचे १००० कोटी रुपयांचे रोखे विक्रीस

## महाराष्ट्र शासनाचे चार वर्षे मुदतीचे १,००० कोटी रुपयांचे रोखे विक्रीस

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र शासनाच्या चार वर्षे मुदतीच्या १,००० कोटींच्या रोख्यांची विक्री शासनाच्या सुधारित अधिसूचनेतील अटी आणि शर्तींच्या अधीन राहून करण्यात येईल. या कर्जाद्वारे मिळालेल्या रकमेचा विनियोग शासनाच्या विकास कामासाठी अर्थपुरवठा करण्यासाठी केला जाईल, अशी माहिती वित्त विभागाच्या सचिव शैला ए. यांनी पत्रकान्वये दिली आहे.

अस्पर्धात्मक लिलाव पद्धतीनुसार (सुधारित) एकूण अधिसूचित केलेल्या शासन कर्जरोखे रकमेच्या १० टक्के रक्कम पात्र वैयक्तिक व संस्थात्मक गुंतवणुकदारांना वाटप करण्यात येईल. मात्र एका गुंतवणुकदारास एकूण अधिसूचित रकमेच्या जास्तीतजास्त एक टक्का रकमेच्या मर्यादेपर्यंत वाटप करण्यात येईल.

२ डिसेंबर, २०२५ रोजी भारतीय रिझर्व्ह बँकेतर्फे मुंबई येथील कार्यालयात लिलाव केला जाईल. तर लिलावाचे बीडस् २ डिसेंबर, २०२५ रोजी संगणकीय प्रणालीनुसार, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, कोअर बँकिंग सोल्यूशन, (ई-कुबेर) सिस्टीमनुसार सादर करावयाचे आहेत.

यामध्ये स्पर्धात्मक बिड्स संगणकीय प्रणालीद्वारे ई-कुबेर सिस्टीमनुसार सकाळी १०.३० ते ११.३० वाजेपर्यंत सादर करावेत. तर अस्पर्धात्मक बीडस् ई-कुबेर सिस्टिमनुसार सकाळी १०.३० ते ११.०० पर्यंत सादर करावेत. लिलावाचा निकाल भारतीय रिझर्व्ह बँकेच्या संकेतस्थळावर त्याच दिवशी प्रसिद्ध करण्यात येईल. यशस्वी झालेल्या बीडर्सकडून रकमेचे प्रदान ३ डिसेंबर, २०२५ रोजी रोखीने, बँकर्स धनादेश/प्रदान आदेश, डिमांड ड्राफ्ट किंवा त्यांच्या रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, मुंबई येथील खात्यात देय असलेले धनादेश बँकेची कामकाजाची वेळ संपण्यापूर्वी अधिदानाने प्रदान करण्यात येतील.

कर्जरोख्याचा कालावधी चार वर्षांचा असून, रोख्यांचा कालावधी १० सप्टेंबर, २०२५ पासून सुरू होईल, तर कर्जरोख्याची परतफेड दिनांक १० सप्टेंबर, २०२९ रोजी पूर्ण किमतीने केली जाईल. व्याजाचा दर हा अधिकतम प्राप्तीचा दर हा लिलावात विक्री केलेल्या रोख्यांवरिल दरसाल दर शेकडा ६.७४ टक्के एवढा असेल. व्याजाचे प्रदान रोख्याच्या मूळ दिनांकापासून मूळ किमतीवर प्रतिवर्षी दिनांक १० मार्च आणि १० सप्टेंबर रोजी सहामाही पद्धतीने करण्यात येईल.

शासकीय रोख्यांमधील बँकांची गुंतवणूक ही बँकिंग विनियम अधिनियम, १९४९ खालील कलम २४ अंतर्गत सांविधिक रोकड सुलभता गुणोत्तर (डडठ) या प्रयोजनार्थ पात्र समजण्यात येईल. हे कर्जरोखे पुन: विक्री-खरेदीसाठी अनुज्ञेय असतील, अशी माहिती वित्त विभागाने दिली आहे.

**महाराष्ट्र शासनाचे नऊ वर्षे मुदतीचे १,००० कोटी रुपयांचे रोखे विक्रीस**

महाराष्ट्र शासनाच्या नऊ वर्षे मुदतीच्या १,००० कोटींच्या रोख्यांची विक्री शासनाच्या सुधारित अधिसूचनेतील अटी आणि शर्तींच्या अधीन राहून करण्यात येईल. या कर्जाद्वारे मिळालेल्या रकमेचा विनियोग शासनाच्या विकास कामासाठी अर्थपुरवठा करण्यासाठी केला जाईल, अशी माहिती वित्त विभागाच्या सचिव शैला ए. यांनी पत्रकान्वये दिली आहे.

अस्पर्धात्मक लिलाव पद्धतीनुसार (सुधारित) एकूण अधिसूचित केलेल्या शासन कर्जरोखे रकमेच्या १० टक्के रक्कम पात्र वैयक्तिक व संस्थात्मक गुंतवणुकदारांना वाटप करण्यात येईल. मात्र एका गुंतवणुकदारास एकूण अधिसूचित रकमेच्या जास्तीतजास्त एक टक्का रकमेच्या मर्यादेपर्यंत वाटप करण्यात येईल.

२ डिसेंबर, २०२५ रोजी भारतीय रिझर्व्ह बँकेतर्फे मुंबई येथील कार्यालयात लिलाव केला जाईल. तर लिलावाचे बीडस् २ डिसेंबर, २०२५ रोजी संगणकीय प्रणालीनुसार, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, कोअर बँकिंग सोल्यूशन, (ई-कुबेर) सिस्टीमनुसार सादर करावयाचे आहेत.

यामध्ये स्पर्धात्मक बिड्स संगणकीय प्रणालीद्वारे ई-कुबेर सिस्टीमनुसार सकाळी १०.३० ते ११.३० वाजेपर्यंत सादर करावेत. तर अस्पर्धात्मक बीडस् ई-कुबेर सिस्टिमनुसार सकाळी १०.३० ते ११.०० पर्यंत सादर करावेत. लिलावाचा निकाल भारतीय रिझर्व्ह बँकेच्या संकेतस्थळावर त्याच दिवशी प्रसिद्ध करण्यात येईल. यशस्वी झालेल्या बीडर्सकडून रकमेचे प्रदान ३ डिसेंबर, २०२५ रोजी रोखीने, बँकर्स धनादेश/प्रदान आदेश, डिमांड ड्राफ्ट किंवा त्यांच्या रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, मुंबई येथील खात्यात देय असलेले धनादेश बँकेची कामकाजाची वेळ संपण्यापूर्वी अधिदानाने प्रदान करण्यात येतील.

कर्जरोख्याचा कालावधी नऊ वर्षांचा असून, रोख्यांचा कालावधी ३ डिसेंबर, २०२५ पासून सुरू होईल, तर कर्जरोख्याची परतफेड दिनांक ३ डिसेंबर , २०३४ रोजी पूर्ण किमतीने केली जाईल. व्याजाचा दर हा अधिकतम प्राप्तीचा दर हा लिलावात विक्री केलेल्या रोख्यांवरिल दरसाल दर शेकडा कूपन दरा एवढा असेल. व्याजाचे प्रदान रोख्याच्या मूळ दिनांकापासून मूळ किमतीवर प्रतिवर्षी दिनांक ३ जून आणि ३ डिसेंबर रोजी सहामाही पद्धतीने करण्यात येईल.

शासकीय रोख्यांमधील बँकांची गुंतवणूक ही बँकिंग विनियम अधिनियम, १९४९ खालील कलम २४ अंतर्गत सांविधिक रोकड सुलभता गुणोत्तर (डडठ) या प्रयोजनार्थ पात्र समजण्यात येईल. हे कर्जरोखे पुन: विक्री-खरेदीसाठी अनुज्ञेय असतील, अशी माहिती वित्त विभागाने दिली आहे.

**महाराष्ट्र शासनाचे १५ वर्षे मुदतीचे १,००० कोटी रुपयांचे रोखे विक्रीस**

महाराष्ट्र शासनाच्या १५ वर्षे मुदतीच्या १,००० कोटींच्या रोख्यांची विक्री शासनाच्या सुधारित अधिसूचनेतील अटी आणि शर्तींच्या अधीन राहून करण्यात येईल. या कर्जाद्वारे मिळालेल्या रकमेचा विनियोग शासनाच्या विकास कामासाठी अर्थपुरवठा करण्यासाठी केला जाईल, अशी माहिती वित्त विभागाच्या सचिव शैला ए. यांनी पत्रकान्वये दिली आहे.

अस्पर्धात्मक लिलाव पद्धतीनुसार (सुधारित) एकूण अधिसूचित केलेल्या शासन कर्जरोखे रकमेच्या १० टक्के रक्कम पात्र वैयक्तिक व संस्थात्मक गुंतवणुकदारांना वाटप करण्यात येईल. मात्र एका गुंतवणुकदारास एकूण अधिसूचित रकमेच्या जास्तीतजास्त एक टक्का रकमेच्या मर्यादेपर्यंत वाटप करण्यात येईल.

२ डिसेंबर, २०२५ रोजी भारतीय रिझर्व्ह बँकेतर्फे मुंबई येथील कार्यालयात लिलाव केला जाईल. तर लिलावाचे बीडस् २ डिसेंबर, २०२५ रोजी संगणकीय प्रणालीनुसार, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, कोअर बँकिंग सोल्यूशन, (ई-कुबेर) सिस्टीमनुसार सादर करावयाचे आहेत.

यामध्ये स्पर्धात्मक बिड्स संगणकीय प्रणालीद्वारे ई-कुबेर सिस्टीमनुसार सकाळी १०.३० ते ११.३० वाजेपर्यंत सादर करावेत. तर अस्पर्धात्मक बीडस् ई-कुबेर सिस्टिमनुसार सकाळी १०.३० ते ११.०० पर्यंत सादर करावेत. लिलावाचा निकाल भारतीय रिझर्व्ह बँकेच्या संकेतस्थळावर त्याच दिवशी प्रसिद्ध करण्यात येईल. यशस्वी झालेल्या बीडर्सकडून रकमेचे प्रदान ३ डिसेंबर, २०२५ रोजी रोखीने, बँकर्स धनादेश/प्रदान आदेश, डिमांड ड्राफ्ट किंवा त्यांच्या रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, मुंबई येथील खात्यात देय असलेले धनादेश बँकेची कामकाजाची वेळ संपण्यापूर्वी अधिदानाने प्रदान करण्यात येतील.

कर्जरोख्याचा कालावधी १५ वर्षांचा असून, रोख्यांचा कालावधी ३ डिसेंबर, २०२५ पासून सुरू होईल, तर कर्जरोख्याची परतफेड दिनांक ३ डिसेंबर, २०४० रोजी पूर्ण किमतीने केली जाईल. व्याजाचा दर हा अधिकतम प्राप्तीचा दर हा लिलावात विक्री केलेल्या रोख्यांवरिल दरसाल दर शेकडा कूपन दरा एवढा असेल. व्याजाचे प्रदान रोख्याच्या मूळ दिनांकापासून मूळ किमतीवर प्रतिवर्षी दिनांक ३ जून आणि ३ डिसेंबर रोजी सहामाही पद्धतीने करण्यात येईल. शासकीय रोख्यांमधील बँकांची गुंतवणूक ही बँकिंग विनियम अधिनियम, १९४९ खालील कलम २४ अंतर्गत सांविधिक रोकड सुलभता गुणोत्तर (डडठ) या प्रयोजनार्थ पात्र समजण्यात येईल. हे कर्जरोखे पुन: विक्री-खरेदीसाठी अनुज्ञेय असतील, अशी माहिती वित्त विभागाने दिली आहे.

# नाशिकमध्ये सासरच्या छळाला कंटाळून नवविवाहितेची आत्महत्या; आत्महत्येपूर्वी लिहिली सात पानी चिठ्ठी

**दैनिक आपला विदर्भ**

**नाशिक/प्रतिनिधी :** नाशिक शहरात एका नवविवाहितेने घरगुती छळाला कंटाळून आत्महत्या केल्याची हृदय पिळवटून टाकणारी घटना समोर आली आहे. पंचवटी परिसरातील हिरावाडीत राहणाऱ्या नेहा संतोष पवार हिने विषारी औषध सेवन करून आयुष्य संपवले. मृत्यूपूर्वी तिने सात पानी चिठ्ठी लिहित पती आणि सासरकडून होत असलेल्या मानसिक, शारीरिक आणि आर्थिक छळाचे गंभीर आरोप केले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, नेहाचे लग्न ४ जून २०२५ रोजी संतोष पवार याच्यासोबत झाले होते. लग्नाला काहीच महिने झाले असतानाच तिच्या जीवनात अत्याचारांची मालिका सुरू झाल्याचे तिने आपल्या चिठ्ठीत स्पष्ट केले आहे. सतत पैशांची मागणी, माहेरहून पैसे आणण्यासाठी दबाव, चारित्र्यावर संशय, आजारी असतानाही काम करायला भाग पाडणे, शिवीगाळ, तसेच नणदी व सासूकडून होणारा अपमान, अशा सर्व प्रकारच्या छळाचा उल्लेख तिने केलेला आहे.

नेहाने चिठ्ठी सासरच्या लोकांकडून लपवली जाईल या भीतीने तिचे फोटो काढून भावाला व्हॉट्सअ‍ॅपवर पाठवले होते. सात पानी चिठ्ठीत तिने पतीच्या वागणुकीबाबत अनेक धक्कादायक दावे केले आहेत. पतीने तिच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिला अपमानित करणे, कौमार्य तपासण्याचा प्रयत्न करणे, तसेच पूर्वीच्या प्रेम संबंधातील अश्लील फोटो दाखवणे, हे सर्व प्रकार तिने चिठ्ठीत नोंदवले आहेत.

चिठ्ठीमध्ये नेहाने पतीच्या अनैतिक संबंधांचा देखील उल्लेख केला आहे. तिने सांगितले की नवऱ्याने त्याच्या गर्लफ्रेंडसोबतचे अश्लील फोटो दाखवले होते. सासरकडून ''माहेरून पैसे आण'' असा सतत दबाव असल्याचेही नेहाने



म्हटले आहे. तिच्या म्हणण्यानुसार, माहेरहून २० हजार रुपये आणि भावाची गाडी आणून दिल्यानंतरही मागण्या थांबल्या नाहीत. नवरा सारखा 'तुझा कोणी ठेवलेला यार असेल' म्हणून सारखी माहेरी जाते असे टोमणे मारायचा.

चिठ्ठीत नेहाने सासू व नणदींकडून होणाऱ्या वागणुकीचाही उल्लेख केला आहे. पाळी आली आहे असे सांगितल्यावर सासूने संशय घेतला आणि नणंदेला तिला पाळी आली आहे की नाही हे चेक करायला सांगितलं होतं. नणंदा टोमणे मारायच्या आणि नवऱ्याला व सासूला खोटे सांगायच्या, असं गंभीर आरोप नेहाने आपल्या सुसाईड नोटमध्ये केले आहेत.

नेहाने आपल्या चिठ्ठीच्या शेवटी लिहिलं होतं की, ''तुम्ही मला खूप प्रेमाने वाढवलं पण माझं नशीब खराब होते, म्हणून नवरा आणि सासर चांगले भेटले नाही. रोज थोडं थोडं मरण्यापेक्षा मी विष पिऊन स्वत:ला संपवते आहे.''

नेहाची चिठ्ठी तपासात महत्त्वाचा पुरावा ठरली आहे. प्राथमिक तपासात पोलिसांनी पती, त्याच्या तीन बहिणी आणि सासूला अटक केली आहे. पंचवटी पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून शवविच्छेदन अहवाल आल्यानंतर पुढील कायदेशीर कारवाई केली जाणार आहे.

अलीकडेच वैष्णवी हागवणे आणि डॉ. गौरी गर्जे आत्महत्या प्रकरणानंतर नाशिकमध्ये पुन्हा एकदा अशीच घटना घडल्याने महिलांच्या सुरक्षिततेविषयी प्रश्न उपस्थित झाले आहेत.

पान १ वरून...

## पुढील दोन-तीन दिवसांत

शेतकऱ्यांच्या कर्जमाफीबाबत शरद पवार काय म्हणाले?

अतिवृष्टी आणि पूर याच्यामुळे राज्यातील काही जिल्ह्यात अतोनात नुकसान झाले आहे. नुकसान दोन प्रकारचे आहे. काही ठिकाणी जमीन वाहून गेली आहे काही ठिकाणी फक्त साधनं वाहून गेली आहेत. आता राज्य सरकारने जे धोरण ठरवलं त्याच्या पाठीमागच्या कर्जाच्या वसुलीला एक वर्षाच्या साठी स्थगिती दिली आहे. एक वर्षाचा हा वसुली थांबवण्याचा निर्णय तात्पुरता उपयोगी ठरेल, पण त्याची गरज भासणार नाही. शेतकऱ्यांचे जे आर्थिक नुकसान झालं आहे ते पाहिल्यानंतर त्याची काही रक्कम सरकारने द्यायला हवी होती. काही रकमेसाठी व्याज माफ करून विविध हप्ते दिले असते तर शेतकऱ्यांना त्याची आर्थिक मदत झाली असती. आताची सरकारी मदत पुरेशी आहे, असे मला वाटत नाही.

## पाच वर्ष उलटले तरी किती

करून तिची हत्या करण्यात आली. हे प्रकरण राजकीय स्तरावर दडपण्यात आले आहे. त्यामुळे या चौकशीची जबाबदारी उइख कडे द्यावी. तसेच, शिवसेना ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे यांच्यावर एफआयआर दाखल करावा.

सालियन यांनी याचिकेत म्हटले की, त्यांची मुलगी अत्यंत संशयास्पद परिस्थितीत मृतावस्थेत आढळली आणि तिच्याशी संबंधित पुरावे व माहिती लपवण्यात आली.

सरकारी वकिलांचा प्रतिवाद

यावर सरकारी वकिलांनी न्यायालयात युक्तिवाद केला, की घटनेनंतर पोलिसांनी अनेकवेळा दिशाच्या आई-वडीलांचे जबाब घेतले होते आणि त्यांनी त्यावेळी कोणावरही संशय व्यक्त केला नव्हता आणि आता पाच वर्षांनी वडील असे गंभीर आरोप करत आहेत.

वडिलांना कागदपत्रे का देत नाही?

न्यायालयाने पोलिसांना फटकारत प्रश्न केला की, सतीश सालियन हे पीडितेचे वडील आहेत. कायद्याने परवानगी असलेली कागदपत्रे त्यांना देण्यात काय अडचण आहे? खंडपीठाने पोलिसांकडून याबाबत स्पष्ट भूमिका मागवली आहे. तसेच न्यायालयाने पोलिसांना शवविच्छेदन अहवाल न्यायालयासमोर सादर करण्याचे निर्देश दिले.

आदित्य ठाकरे यांचाही हस्तक्षेप अर्ज

या याचिकेत आदित्य ठाकरे यांनी हस्तक्षेप याचिका दाखल केली आहे. त्यांचा दावा आहे की सतीश सालियन यांनी दाखल केलेली याचिका खोटी आणि राजकीय हेतूने प्रेरित आहे.

त्यांनी न्यायालयाकडे विनंती केली आहे की, या प्रकरणात कोणताही आदेश देण्यापूर्वी त्यांची बाजू ऐकली जावी.

या प्रकरणाची पुढील सुनावणी ११ डिसेंबर रोजी होणार असून त्या दिवशी पोलिसांनी दस्तऐवज पुरवण्याबाबत आपली भूमिका, तसेच चौकशीची सद्यस्थिती न्यायालयासमोर स्पष्ट करायची आहे.

## देवेंद्र फडणवीस गृहमंत्री आहेत

दोन दिवसाआधी कळमेश्र्वर मध्ये काँग्रेसच्या कार्यकर्त्यांकडून भाजपच्या कार्यकर्त्यांला मारहाण झाली होती. त्यात काँग्रेसच्या उमेदवाराच्या पतीचे नाव पुढे आले होते. त्याला प्रतिउत्तर देताना आशिष देशमुख यांनी चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थित ही भाषा वापरली आहे. सद्या नागपूर जिल्ह्यात आशिष देशमुख यांच्या या भाषणाची मोठ्या प्रमाणात चर्चा होत आहे. कळमेश्र्वरची संस्कृती बिघडू नये अशी आमची भूमिका आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री यांच्या नेतृत्वात विविध योजना सुरु करण्यात आल्या आहेत. या योजना कळमेश्र्वरमध्ये आणायच्या आहेत. आरोग्याच्या योजना आणायच्या आहेत असे आशिष देशमुख म्हणाले. येणाऱ्या दोन तारखेला प्रामाणिक आणि तुमच्यासाठी झटणाऱ्या उमेदवाराला निवडून द्या असे आवाहन आशिष देशमुख यांनी केले. आज कोणत्याही गावात गेले तर सर्वजण आपुलकीने जवळ येतात असे आशिष देशमुख म्हणाले.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले.
मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## खेळताना ट्रॅक्टरवर चढला, चुकून गिअर पडला अनब ; बार्शीत ४ वर्षांच्या चिमुकल्याचा मृत्यू

**सोलापूर/प्रतिनिधी :** सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुक्यातील शेळगावमध्ये गुरुवारी दुपारी ४ वर्षांच्या मुलाचा ट्रॅक्टरसह विहिरीत पडून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. गावात विहिरीत अडकलेली मोटार बाहेर काढण्याचे काम सुरू असताना ही दुर्घटना झाली.

याचदरम्यान जवळच खेळत असलेला शिवराज संदिप शेरखाने हा चार वर्षांचा मुलगा खेळता खेळता ट्रॅक्टरवर चढला. चुकून त्याच्या हातून गिअर सरकल्याने ट्रॅक्टरचा तोल गेला आणि क्षणार्धात तो थेट विहिरीत कोसळला. ही घटना इतकी अचानक घडली की आसपासच्या लोकांना प्रत्यक्षात काही समजायलाच वेळ मिळाला नाही. ट्रॅक्टर विहिरीत पडताच शिवराज बेचक्यात अडकल्याने त्याला वाचवणे अशक्य बनले. अपघातानंतर शिवराजचे वडील संदिप शेरखाने यांनी मुलाला वाचवण्यासाठी तत्काळ धाव घेतली. गावातील युवकांनीही जीवाची पर्वा न करता विहिरीत उड्या म ारत शोध मोहिम हाती घेतली. स्थानिक पोलिस आणि अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आले.

अग्निशमन आणि पोलीस पथकाने घटनास्थळी पोहोचताच रेस्क्यू ऑपरेशन सुरू केले. मात्र ट्रॅक्टर विहिरीच्या तळाशी अडकलेला, खोल पाणी आणि चिखल यामुळे शोधकार्य अत्यंत गुंतागुंतीचे झाले. ट्रॅक्टर बाहेर काढणे शक्य नसल्याने प्रथम विहिरीतील पाणी कमी करण्याचा निर्णय घेतला. सलग १२ तासांच्या प्रयत्नांनंतर विहिरीतील पाणी बाहेर काढण्यात यश आले आणि पाणी उतरल्यावर शिवराजचा मृतदेह तळाशी दिसून आला. संपूर्ण परिसरात शोककळा पसरली. अवघ्या चार वर्षांच्या निरागस मुलाचा झालेला मृत्यू कुटुंबासाठी आणि गावासाठी मोठा धक्का आहे.

## भारतीय क्रिकेटपटू पुजाराच्या मेहुण्याची आत्महत्या! बलात्काराचा आरोप अनब एका वर्षात जीवन संपवले

**राजकोट/वृत्तसंस्था :** भारतीय क्रिकेटपटू चेतेश्वर पुजारा त्याच्या वैयक्तिक आयुष्यातील नातेसंबंधामुळे चर्चेत आला आहे. पुजाराचा मेहुणा जीत रसिखभाई पाबरीवर याने आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. आत्महत्येचे कारण अद्याप स्पष्ट झाले नसले तरी तपास सुरू झाला आहे. एका तरुणीने जीत विरोधात २६ नोव्हेंबर २०२४ रोजी बलात्काराची तक्रार दाखल केली होती. या प्रकरणाला एक वर्ष पूर्ण होताच जीतने आत्महत्या केली असल्याने त्याच्या आत्महत्येसाठीचे प्राथमिक कारण हेच सांगितले जात आहे. लग्नाचे आश्वासन देऊन शरीरसंबंध ठेवल्याचा आरोप या तरुणीने तक्रारीमध्ये केला होता. यामुळे तणावाखाली आलेल्या जीतने राहत्या घरी गळफास घेत आत्महत्या केल्याने कुटुंबावर शोककळा पसरली आहे.जीत पाबरी विरोधात एका तरुणीने २६ नोव्हेंबर २०२४ रोजी मालवीय नगर पोलिसात बलात्काराची तक्रार दाखल केली होती. या तरुणीसोबत जीतचा साखरपुडा झाला होता. पण पुढे दोघांमध्ये काहीतरी बिनसल्याने त्यांनी नातेसंबंध तोडून टाकले. त्यानंतर तरुणीने जीत विरोधात बलात्काराची तक्रार नोंदवली. लग्नाचे आश्वासन देऊन साखरपुडा झाल्यावर जीतने अनेकदा जबरदस्तीने शरीरसंबंध ठेवले आणि नंतर लग्न मोडले, असे गंभीर आरोप तरुणीने केले. या प्रकरणाम ुळे जीत विरोधात तक्रार दाखल झाल्यानंतर वर्षभरातच जीतने आत्महत्या करत जीवन संपवले. यावेळी चेतेश्वर पुजारा भारत विरुद्ध दक्षिण आफ्रिका कसोटी सामन्यात समालोचन करत होता. मिळालेल्या माहितीनुसार, जीत गेल्या वर्षभरापासून कायदेशीर खटल्याचा सामना करत होता. यामुळे तो बराच ताणतणावात होता. पण आत्म हत्येमागील नेमके कारण शवविच्छेदन अहवाल आणि पुढील चौकशीनंतरच स्पष्ट होणार आहे,

# शशिकांत शिंदे यांच्या वक्तव्याने राज्यात मोठ्या भूकंपाचे संकेत

## म्हणाले, शरद पवारांची राष्ट्रवादी अन् शिंदेंच्या शिवसेनेची युती ही भविष्याची नांदी

दैनिक आपला विदर्भ



**सोलापूर/प्रतिनिधी :** राज्यभरात सध्या अनेक युत्या होत आहेत. मात्र, कुर्डूवाडीतील एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेसोबत झालेली आमची युती महाराष्ट्राच्या भविष्यातील नांदी देखील ठरू शकते, असे मोठे वक्तव्य राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी केले आहे. कुर्डूवाडी नगरपालिकेच्या प्रचारासाठी आले असता शिंदे यांनी केलेले वक्तव्य महायुती धोक्यात येण्याचे संकेत ठरू शकतात.

महाराष्ट्रात अनेक निवडणुका चालू आहे. मात्र सोलापूरच्या निवडणुकांमध्ये दररोज मोठ्या घडामोडी घडत आहेत, असे सांगत अनगर सांगोला अशा नगरपालिकेतील भाजपच्या भूमिकेवर अप्रत्यक्षपणे शिंदे यांनी निशाणा साधला. या सगळ्या घडामोडींवर सगळ्यांचे लक्ष आहे, असे सांगताना काही लोक हे फक्त फायद्यासाठी वापर करतात आणि नंतर सोडून देतात. असे सांगत भाजपला थेट टोला लगावला.

एकनाथ शिंदे यांचा केवळ वापर करून घेतल्याचा सूचक इशारा देताना आपण सर्व साधी माणसं आहोत, असे सांगत एकनाथ शिंदे यांचा फक्त वापर झाल्याचे सूचक वक्तव्य शशिकांत शिंदे यांनी केले. आपण सर्व साधी माणसे आहोत. पण लढणारी माणसे कधीच शरणागती घेत नसतात, असेही शिंदे यांनी सांगितले. कुर्डूवाडी येथे झालेली युती ही भविष्यातील नांदी सुद्धा असू शकेल, असे सांगत भविष्यात शरद पवारांची राष्ट्रवादी आणि एकनाथ शिंदे यांची शिवसेना एकत्र येण्याचे स्पष्ट संकेत त्यांनी यावेळी दिले.

सध्या रोज भाजप आणि एकनाथ शिंदे यांची शिवसेना यांच्यात सुरू असलेल्या वादावादीतून राज्यातील नगरपालिका निवडणुकीत अनेक ठिकाणी शिंदे गटाने भाजपच्या विरोधात विरोधी पक्षांची आघाडी केल्याचे चित्र आहे. अशाच पद्धतीने भाजपनेही एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला अडचणीत आणण्यासाठी प्रयत्न सुरू केल्याने भाजप आणि शिंदेसेना यांच्यातील वाद दिवसेंदिवस वाढत चालला आहे. अशावेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी कुर्डूवाडी येथे झालेल्या शिंदे सेना आणि शरद पवार गट यांच्या युतीवरून बोलताना हे मोठे वक्तव्य केले आहे. यामुळे आता राज्यात नवीन समीकरणाचे संकेत शरद पवार गटाच्या प्रदेशाध्यक्षांनी दिल्याने महायुतीत येत्या काही दिवसात मोठ्या राजकीय घडामोडी आणि भूकंप होण्याची शक्यता आहे.

सध्या, कुर्डूवाडी नगरपरिषद निवडणुकीत शिवसेना शिंदे गटाची आणि राष्ट्रवादी शरद पवार पक्षाची युती झालेली आहे. या पॅनलच्या उमेदवाराच्या प्रचारासाठी आलेल्या जाहीर सभेत प्रदेशाध्यक्ष शिंदेनी हे राजकीय वक्तव्य केलंय.

## हिंजवडीत हृदय हेलावणारी घटना, २० चिमुकल्यांना अंगणवाडीत कोंडून ठेवलं; आक्रोश कॅमेऱ्यात कैद!



**पुणे/प्रतिनिधी :** पुण्यातील हिंजवडीच्या घ्ऊ हबमधील एका अंगणवाडीत घडलेल्या प्रकाराने पालक आणि स्थानिक नागरिक चांगलेच हादरले. शिकवायचं, खेळवायचं आणि सांभाळायचं अंगणवाडी केंद्र मात्र काही काळासाठी 'बंदिस्त खोली' बनलं. अंगणवाडीतील २० चिमुकल्यांना आत कुलूप लावून सेविका आणि मदतनीस बैठक अटेंड करण्यासाठी निघून गेल्या. या संपूर्ण घटनेचा व्हिडीओ समोर आल्यानंतर पालकांचा संताप आणि चिंता दोन्ही तीव्रतेने उफाळून आले आहेत.

नक्की कुठे घडला हा प्रकार?

हा प्रकार हिंजवडीमधील अंगणवाडी नंबर ३ मध्ये घडला. दुपारी ११ ते १२ या तासाभराच्या कालावधीत मुलं आत बंद होती आणि व्हिडीओमध्ये त्यांचा रडण्याचा आवाज, घाबरलेले चेहरे आणि एकटेपणाचा आक्रोश स्पष्ट जाणवतो. घ्ऊ हबसारख्या गजबजलेल्या भागात मुलांना अशा अवस्थेत टाकून जाणं ही बेदरकार कृती असली तरी, तिचे परिणाम मात्र गावाच्या चौकापासून ते सोशल मीडियाच्या स्क्रीनपर्यंत सर्वत्र पोहोचले.

बैठक महत्त्वाची की मुलांचे जीव?

सविता शिंदे (सेविका) आणि शिल्पा साखरे (मदतनीस) यांनी ग्रामपंचायतीतील एका बैठकीसाठी बोलावलं गेल्याचा दाखला दिला. आम्हाला 'यात मान होता, उपस्थिती महत्त्वाची होती,' असं सांगत त्यांनी स्पष्टीकरण दिलं, मात्र मुलांना आत ठेवून कुलूप लावून जाणं ही 'क्षुल्लक गोष्ट' नव्हती, हे आता जगजाहीर झालं आहे. बैठकीला बोलावणारे ग्रामपंचायतीत एका माजी सरपंच असल्याचे कारण समोर आले, पण 'मुलांना सांभाळण्याची जबाबदारी' बैठक बोलावणाऱ्यांपेक्षा मोठी असते, हेच त्या विसरल्या.

अधिकाऱ्यांचे तातडीचे पाऊल, पण...

घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी मुळशी पंचायत समितीला कळवलं. बालविकास विभागाचे अधिकारी धनराज गिराम यांनी कोणताही विलंब न करता, सेविका आणि मदतनीसांना बैठक सोडून तात्काळ कुलूप उघडण्याचे आदेश दिले. मात्र, या घटनेनंतर जबाबदारांवर काय कारवाई होणार, पालकांच्या तक्रारीचं पुढे काय रूप घेणार आणि बाल विकास विभाग याला 'अधिकृत दखल' कशी देणार, याकडे आता सर्वांचे लक्ष लागून आहे.

# संविधान दिन उत्साहात संपन्न; जिल्हा परिषद मराठी उच्च प्राथमिक शाळा, बेलगाव येथे विविध उपक्रमांचे आयोजन







दैनिक आपला विदर्भ

■ गजानन जाधव

**बेलगाव :** जिल्हा परिषद मराठी उच्च प्राथमिक शाळा, बेलगाव येथे संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. संविधान दिनाच्या औचित्य साधून शाळेत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन करून करण्यात आली. त्यानंतर प्रभात फेरी काढून संविधानाविषयी घोषणांद्वारे जनजागृती करण्यात आली.

या निमित्ताने वकृत्व स्पर्धा आणि रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषेत प्रभावी भाषणे सादर करत उपस्थितांचे मन जिंकले. विजयी विद्यार्थ्यांना शालेय व्यवस्थापन समितीचे माजी अध्यक्ष श्री. दिनकर मैंद व अध्यक्ष श्री. नितीन इंगळे यांच्या हस्ते प्रोत्साहनपर बक्षिसे देण्यात आली.

कार्यक्रमात संविधानाचे महत्त्व, नागरिकांचे अधिकार आणि मूलभूत कर्तव्ये याबाबत विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. या प्रसंगी शाळेतील सर्व शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्री. पिंपरकर सर यांनी केले, तर प्रमुख आभार प्रदर्शन कुमारी अंभोरे मॅडम यांनी केले.


## शब्दकोडे क्र. 20

आडवे शब्द

१. उगीच ५. पावलोपावली ८. मनसोक्त, समाधान होईल इतके ११. जनावरांचे ओरडणे १२. लहान १३. गंध १५. घरोघर १७. दहा तोंडाचा, दशमुखी १९. गवंड्याकडील पाणी वाहून नेण्याची कातडी पिशवी २०. एक अजस्र, हिंस्र जलचर २१. कन्या, पुत्री २३. आकार-उंची-वयाने कमी २५. सर्प २६. बाळभाषेत पाणी २७. कंड २९. मृत्यू, वेळ ३०. गुणाकार, सोंगट्या मांडण्याचे वस्त्र ३२. परीक्षा घेणारा ३५. वेतन ३८. टाळ्यांचा आवाज ४१. कैफी, नशा आणणारा ४३. निराश ४४. हात, हस्त ४५. शंभर पैशाचे नाणे ४७. नाल्यावरील पूल ४९. प्रेत, कलेवर ५०. थरथरणारा आवाज ५१. केर ५४. धुसफूस, जीवाला होणारा त्रास ५६. मनाला टोचणारे दुःख ५८. प्रजाजन, देशाचा रहिवासी ६०. साडेसातीचा ग्रह ६२. बंदुकीची फैर ६३. पर्वणी, सणाचा दिवस ६४. रंग ६५. अटीची भाषा ६७. कामाचे कोष्टक ६९. टाळाटाळ, चुकवाचुकव ७०. निकट ७२. मीठाचा चव ७४. फाटलेल्या दधाच्या वड्या ७५. सकस ७७. उत्सव ७८. पंकज, सरोज ८०. नवरा (ग्रा.) ८१. समीक्षा, शेरेताशेरे ८२. दरवाजा ८३. लाकडी पादुका ८४. आदर सत्कार ८६. आजच्या आधीचा दिवस ८८. तोफगाडी ८९. नम्रता ९०. परत पाठविणे

उभे शब्द

१. स्त्री भूत २. सारा, टॅक्स ३. चौक ४. विड्याचे टोकदार पान ५. पटल ६. आर्धी ओंजळ ७. दीनांवर दया करणारा, परमेश्वर ८. मदनाचे एक शस्त्र ९. बोलता येत नाही असा १०. रुग्णालय १४. अखंड १६. निमग्न, रममाण १८. पुरुष २०. अडकित्त्याने कातरण्याचे फळ २२. असंमती २४. कपडालत्ता २६. पाप करण्यास घाबरणारा २८. सततचे नामस्मरण ३१. रोखलेली नजर ३३. माफी मागणे ३४. रेशमी वस्त्र ३६. गर्दभ ३७. इंद्राचा हत्ती ३९. टपाल ४०. फळावरील साल ४२. कशा प्रकारचा? ४३. नष्ट होणे ४६. साखरेचा रस ४८. सोने ५०. संध्याकाळ ५२. संताप, क्रोध ५३. निर्लज्ज ५५. झाकण असलेले पात्र ५६. सगळीकडे ५७. प्राण ५९. निरुद्योगी ६१. नेहमी, नीती ६३. एक फळ ६५. छातीतील दाह ६६. रात्र ६८. उणीव भरून काढणे ६९. शर्त ७१. दिलेला आशीर्वाद ७२. संसद सदस्य ७३. तीव्र ऊन ७४. वारा, हवन ७५. कलावंत ७६. गर्दी, गजबज ७९. स्त्रियांची छेड काढणारा ८३. छोटा दगड ८४. आई ८५. झाडावर पिकलेले फळ ८७. वेल



### शब्दकोडे क्र. 19 चे उत्तर

आडवे उत्तर

१.तोच चंद्रमा नभात तीच चैत्र यामिनी १०.व्यथा ११.रग १२.रात्र १४.भान १५.माती १६.नीच १७.विनाकारण १९.दिन २०.यक्ष २१.रसना २३.साल २४.राज २६.अवाजवी २९.महाराष्ट्र नवनिर्माण सेना ३१.हर ३२.सर्कस ३३.गीता ३४.नाक ३५.रग ३६.इतपत ३७.तोटा ३८.लड्डु ३९.तरतरीत ४०.तारा ४१.धनी ४३.राजा शिवाजी ४५.यथातथा ४७.तपास ४९.गज ५१.पर ५२.रम्य ५३.कसेल त्याची जमीन ५६.जम ५८.टवाळ ६०.सामना ६१.गर ६२.तमाशा ६३.फराळ ६४.पाप ६५.गदारोळ ६६.आपुलकी ६७.सर्वत्र ६८.हर ६९.आजी ७०.जस्त ७१.रमणी ७२.मौन ७३.परवा

उभे उत्तर

२.चलन ३.द्रव्यहीन ४.माथा ५.भारतीय जनता पक्ष,शिवसेना ६.तग ७.चराचर ८.चैत्र ९.यातना १३.घण १७.विना १८.काजवा २२.सहाण २३.साहस २४.राष्ट्रगीत २५.अनिल २६.अनाकलनीय २७.हजर २८.वीरगती २९.मसलत ३०.सेना ३६.इतराजी ३७.तोरा ३९.तळतळाट ४०.ताजी ४२.खातरजमा ४४.मगज ४६.थाप ४८.सरळ ५०.जमीनदार ५३.कमळ ५४.त्यागपत्र ५५.चीर ५७.म शालजी ५९.वास्तपुस्त ६०.सारा ६२.तळ ६३.फकीर ६४.पार्वती ६५.गहन ६६.आज ६९.आवा

